| केंद्र क्रमांक | आसन क्रमांक | प्रश्नपत्रिका कोड क्र. |
|---|---|---|
| | H 2 1 1 7 7 1 0 | 0 1 1 1 |

# माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा, २००३
## भाषा (मराठी)
### (एकूण गुण—१००)

रविवार, दिनांक १६ फेब्रुवारी २००३] © [वेळ : सकाळी ११-०० ते दुपारी १२-००

*सर्व सामान्य सूचना:— खाडाखोड केलेली अगर गिरविलेली उत्तरे ग्राह्य धरली जाणार नाहीत.*

## विभाग 1
### (गुण — 20)

***सूचना:— (1) प्रश्न क्रमांक 1 व 2 उत्तरपत्रिकेच्या विभाग 1 मध्येच लिहावेत.***

***(2) या विभागातील प्रत्येक प्रश्नास 10 गुण आहेत.***

***(3) सुंदर हस्ताक्षर व टापटीप यासाठी दोन गुण राखून ठेवलेले आहेत.***

1. खालील विषयावर 10 आळी निबंध लिहाः त्यासाठी खाली दिलेल्या मुद्द्यांचा उपयोग करा.

   *'माझी आदर्श व्यक्ती'* .........

   (मुद्दे:— आदर्शाची तुमची कल्पना — तुमची आदर्श व्यक्ती — ती व्यक्ती तुम्हाला आदर्श का वाटते? — तुमच्यावरील परिणाम)

2. दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कल्पना विस्तार करा.

   *'साक्षर जनता। भूषण भारता'*

   मुद्दे:— मी शास्त्रज्ञ झालो तर

   (1) कां व्हावेसे वाटते

   (2) कसे करणार

   (3) कोणत्या विषयाबद्दल शोध लावावासा वाटते

   (4) संशोधनाचे उपयोग

| केंद्र क्रमांक | आसन क्रमांक | प्रश्नपत्रिका कोड क्र. |
|---|---|---|
| | H 2 1 1 7 7 1 0 | 0 1 1 1 |

# माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा, २००३
## भाषा (मराठी)
**(एकूण गुण—१००)**

रविवार, दिनांक १६ फेब्रुवारी २००३] © [वेळ : सकाळी ११-०० ते दुपारी १२-००

*सर्व सामान्य सूचनाः— खाडाखोड केलेली अगर गिरविलेली उत्तरे ग्राह्य धरली जाणार नाहीत.*

### विभाग 1
**(गुण — 20)**

***सूचनाः— (1) प्रश्न क्रमांक 1 व 2 उत्तरपत्रिकेच्या विभाग 1 मध्येच लिहावेत.***

***(2) या विभागातील प्रत्येक प्रश्नास 10 गुण आहेत.***

***(3) सुंदर हस्ताक्षर व टापटीप यासाठी दोन गुण राखून ठेवलेले आहेत.***

1. खालील विषयावर 10 आळी निबंध लिहाः त्यासाठी खाली दिलेल्या मुद्द्यांचा उपयोग करा.

   *'माझी आदर्श व्यक्ती'* .........

   (मुद्देः— आदर्शाची तुमची कल्पना — तुमची आदर्श व्यक्ती — ती व्यक्ती तुम्हाला आदर्श का वाटते? — तुमच्यावरील परिणाम)

2. दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कल्पना विस्तार करा.

   *'साक्षर जनता। भूषण भारता'*

   मुद्देः— मी शास्त्रज्ञ झालो तर

   (1) कां व्हावेसे वाटते

   (2) कसे करणार

   (3) कोणत्या विषयाबद्दल शोध लावावासा वाटते

   (4) संशोधनाचे उपयोग

## विभाग 2

## (गुण — 80)

*सूचनाः— (१) विभाग 2 मधील 3 ते 42 प्रश्नाची उत्तरे उत्तरपत्रिकेच्या विभाग 2 मध्येच लिहावीत.*

*(२) विभाग 2 मधील प्रश्नाना प्रत्येकी 2 गुण आहेत.*

*(३) विभाग 2 मधील प्रत्येक प्रश्नात दिलेल्या सूचनेनुसार जे बरोबर असेल त्याचा पर्याय क्रमांक त्या प्रश्नाच्या समोरील चौकटीत लिहा.*

**प्र. 3. ते 7. → खाली दिलेला उतारा काळजीपूर्वक वाचा. त्याखाली दिलेल्या प्रत्येक प्रश्नासाठी उत्तराचे चार पर्याय दिलेले आहेत. योग्य पर्यायाची निवड करून त्याचा क्रमांक उत्तरपत्रिकेत प्रश्न क्रमांकासमोरील चौकटीत लिहा.**

*आपले राष्ट्रीय निशाण म्हणजे आपल्या स्वातंत्र्याचे प्रतीक आहे. अशोकचक्रांकित हा तिरंगाध्वज हे आपले राष्ट्रीय निशाण आहे. असा हा राष्ट्रध्वज म्हणजे केवळ तिरंगी कापड नसून त्याला व त्याच्या प्रत्येक भागाला विशिष्ट अर्थ आहे. सर्वात वरचा केशरी रंग हा देशाच्या स्वातंत्र्यासाठी ज्यांनी आपले रक्त सांडले, त्यांच्या त्यागाची आठवण करून देतो. मधला पांढरा रंग हा पावित्र्य, शुद्धता व साधेपणाचे निदर्शक आहे. तो सर्व रंगांच्या मिश्रणाने बनतो ; म्हणून सर्वांना सामावून घेणे हा त्याचा गुणधर्म आहे, विशाल सहृदयता व सर्वसमावेशकता याचे तो मूर्तिमंत प्रतीक आहे. सर्वात खालचा हिरवा रंग हा या हरित शामल भूमातेला समृद्ध करणाऱ्या शेतकऱ्याचे कष्टाचे, देशाच्या समृद्धीचे व भरभराटीचे द्योतक आहे. देशाच्या विकासासाठी सतत मेहनत व परिश्रम केले पाहिजेत असा तो संदेश देतो. पांढऱ्या रंगावरचे निळे अशोकचक्र हे शांतीचे, अंहिसेचे व सद्गुणांचे प्रतीक आहे. आपल्या थोर परंपरेचे व संस्कृतीचे ते निदर्शक आहे. त्याचे चोवीस आरे म्हणजे दिवसाचे चोवीस तास. 'सतत कार्यरत राहा, गतिमान राहा, वेळ वाया घालू नका.' असा ते संदेश देते, असा हा आपला राष्ट्रध्वज आपल्या देशाच्या स्वांतत्र्याची व ते प्राप्त करण्यासाठी अपार कष्ट सोसलेल्या व्यक्तींची आठवण करून देतो. देश सुरक्षित ठेवण्याच्या जबाबदारीची तो सतत जाणीव करून देतो.*

3. कोणता रंग पावित्र्याचे प्रतीक आहे?
   (1) केशरी (2) पांढरा (3) हिरवा (4) तीनही रंग

4. अशोकचक्र कशाचे प्रतीक आहे?
   (1) पावित्र्याचे (2) समृद्धीचे (3) शांतीचे (4) भरभराटीचे

5. कोणता रंग हुतात्म्यांच्या त्यागाची आठवण करून देतो?
   (1) केशरी (2) लाल (3) हिरवा (4) पांढरा

6. हिरवा रंग कशाचे द्योतक आहे?

(1) अहिंसेचे (2) देशाच्या थोर परंपरेचे

(3) पावित्र्याचे (4) हरित शामल भूमीचे

7. राष्ट्रध्वज आपणास कोणत्या गोष्टींची जाणीव करून देतो?

(1) देशासाठी कष्ट सोसलेल्या व्यक्तींची

(2) देशाच्या स्वांतत्र्याची

(3) देश सुरक्षित ठेवण्याच्या जबाबदारीची

(4) या तीनही गोष्टींची

**प्र. 8. ते 12. → खालील संवाद वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांच्या योग्य उत्तराचे पर्याय क्रमांक चौकटीत लिहा.**

*"सौरभ, आज सकाळची शाळा म्हणून मी सहालाच घरुन निघालो."*

*"हो ना. बराच वेळ झाला, अजून बस आली नाही."*

*"अहो, काका किती वाजले हो?"*

*"जरा, स्वतःचं घड्याळ घ्या की; म्हणजे दुसऱ्याला विचारायची वेळ येणार नाही!"*

*"अहो, इतकं बोलण्यापेक्षा सरळ सांगायचं!"*

*"तुम्ही हो, कोण मधे बोलणार?"*

*"मी आप्पा भोसले. बाळांनो, सात वाजलेत!"*

*"बापरे! गौरव आता अर्धा तासच बाकी उरलीय शाळा भरायला."*

8. हा संवाद किती वाजता व कोठे घडला?

(1) सात वाजता सौरभच्या घरी

(2) सात वाजता बसस्टॉपवर

(3) सहा वाजता रस्त्यात

(4) सात वाजता रस्त्यात

9. शाळा किती वाजता भरणार आहे?

(1) सकाळी १० वाजता (2) सकाळी ६-३० वाजता

(3) सकाळी ७-३० वाजता (4) नक्की सांगता येणार नाही.

10. आप्पांचा स्वभाव कसा आहे?

(1) तिरसट (2) दयाळू (3) रागीट (4) अहंकारी

11. 'तुम्ही हो कोण मधे बोलणार?' असे कोण म्हणाले?

(1) गौरव (2) सौरभ (3) आप्पा भोसले (4) यापैकी नाही

12. हा संवाद किती जणात झाला?

(1) २ (2) ३ (3) ४ (4) ५

**प्र. 13. ते 17. → खाली एका सुसंगत परिच्छेदाची पाच वाक्ये दिली आहेत. योग्य पर्याय निवडून परिच्छेदाची वाक्ये पूर्ण करण्यासाठी योग्य शब्दाचा पर्याय क्रमांक लिहा.**

13. सकाळीच पक्ष्यांची ———— ऐकून शिवाजीराव जागे झाले.

(1) किलबिल (2) गडबड (3) चिवचिव (4) गोंगाट

14. घड्याळात ———— वाजले होते.

(1) आठ

(2) सात

(3) सहा

(4) निश्चित सांगता येणार नाही

15. व्याख्यान देण्यासाठी त्याना सकाळी आठची बस पकडण्यास ———— जायचे होते.

(1) शाळेत (2) विमानतळावर (3) बंदरावर (4) स्टेशनवर

16. शिवाजीराव हे एक उत्तम ———— होते.

(1) अभिनेते (2) व्याख्याते (3) श्रोते (4) प्रेक्षक

17. ———— उरकून कसेबसे ते सात वाजता घरा बाहेर पडले.

(1) हळूहळू (2) सावकाश (3) भरभर (4) शांतपणे

**प्र. 18. ते 22.** → **खालील कविता वाचून त्या खालील प्रश्नांची उत्तरे शोधा व त्यांचे पर्याय क्रमांक लिहा.**

*भारतभूमी सुजलां-सुफलाम् होती एके काळी*
*हरित वृक्षांनी नटली होती, पर्वत वने ही सगळी*
*आज असे, दुष्काळ-प्रदूषण, अवर्षणही घेते बळी*
*जो मृत्यूचे केवळ कारण तया बिघडे पर्यावरण म्हणती*

*वृक्ष तोडुनि हाच बिघडवितो, समतोल निसर्गाचा*
*रूक्ष करोनि तोच थांबवितो, ओघ पावसाचा*
*ध्वनी-प्रदूषण अनुज याचा, बिघडवितो समतोल मनाचा*
*वायू-प्रदूषण भ्राता दुजा हा, करी नाश सर्वस्वाचा*

*ऐसी करणी पर्यावरणाची, विचार करुनि सांगा मनास*
*तरुविना तरणे नाही, लावा एका तरी वृक्षास*
*शतक एकविसावे असे हे, काय सांगेल आम्हांस?*
*जीव घ्यावया टपला असुर, जाग का न ये तुम्हास?*

18. वृक्ष तोडल्यामुळे काय होते?
(1) जमीनीची धूप थांबते (2) पाऊस पडण्यास मदत होते
(3) निसर्गाचा समतोल राखला जातो (4) निसर्गाचा समतोल बिघडतो.

19. 'धाकटा भाऊ' या अर्थाचा कवितेत कोणता शब्द आला आहे?
(1) अग्रज (2) अनुज
(3) भ्राता (4) बंधू

20. मनाचा समतोल कशामुळे बिघडतो?
(1) वायू-प्रदूषणामुळे (2) दक्ष न राहिल्याने
(3) ध्वनी-प्रदूषणामुळे (4) अवर्षणामुळे

21. कोणता राक्षस जीव घ्यायला टपला आहे?
(1) दुष्काळाचा (2) ध्वनी-प्रदूषणाचा
(3) वायू-प्रदूषणाचा (4) बिघडलेल्या पर्यावरणाचा

22. पर्यावरण रक्षणासाठी कवीने काय सांगितले आहे?
(1) वायू-प्रदूषण वाढवा (2) वृक्षारोपण करू नका
(3) एक तरी झाड लावा (4) ध्वनी-प्रदूषण वाढवा

प्र. 23. व 24. → डावीकडे दिलेल्या शब्दाच्या विरुद्धार्थी शब्दाचा पर्याय क्रमांक लिहा.

23. *कवी :*

(1) कवित्री (2) कवयत्री (3) कवयित्री (4) कवियत्री

24. *प्रशंसा :*

(1) निंदा (2) असूया (3) शाबासकी (4) शिक्षा

प्र. 25. व 26. → डावीकडे दिलेल्या शब्दाच्या समानार्थी शब्दाचा पर्याय क्रमांक लिहा.

25. *घर :*

(1) गेह (2) गृह (3) प्रसाद (4) तीनही पर्याय बरोबर

26. *झाड :*

(1) रूक्ष (2) आंबा (3) वारू (4) पादप

27. चुकीची जोडी शोधा.

(1) ज्ञानेश्वर — ओवी (2) रामदास — दासबोध

(3) व्यास — महाभारत (4) वाल्मिक — रामायण

28. 'आरती प्रभू' हे कोणाचे टोपणनाव आहे?

(1) चिं. त्र्यं. खानोलकर (2) चिं. वि. जोशी

(3) य. गो. जोशी (4) कुसूमावती देशपांडे

29. बरोबर जोडी कोणती?

(1) अकलेचा खंदक — अत्यंत शहाणा मनुष्य

(2) खुशालचेंडू — अत्यंत चैनी मनुष्य

(3) गाजरपारखी — प्रत्येक गोष्ट पारखून घेणारा

(4) लंकेची पार्वती — अंगावर भरपूर दागिने घातलेली स्त्री

30. चुकीच्या अर्थाचा वाक्प्रचार ओळखा.

(1) निगराणी करणे — काळजी घेणे.

(2) भ्रमनिरास होणे — वास्तवाची कल्पना येणे.

(3) मंत्रमुग्ध होणे — भारावून जाणे.

(4) डोळे लावून बसणे — डोळे मिटून बसणे.

31. खाली दिलेल्या अक्षरांपासून एक अर्थपूर्ण शब्द तयार होतो. त्या शब्दाचा अर्थ असलेला पर्याय क्रमांक लिहा.

*दं त व ड .........*

(1) दात ओढणे (2) नमस्कार (3) नाशवंत (4) शिक्षा करणे

32. खालील सोडवून दाखविलेल्या संधीयुक्त शब्दाचे चार पर्याय दिले आहेत. योग्य उत्तराचा पर्याय क्रमांक लिहा.

*बहि: + अंग :*

(1) बाह्यंग (2) बहिरंग (3) बाह्यांग (4) बहीरंग

33. 'कलाकृती' या शब्दाचा संधी विग्रह खालीलपैकी कोणता?

(1) कला + आकृती (2) कल + आकृती (3) कला + कृती (4) कला + अकृती

प्र. 34. व 35. → खालीलपैकी निश्चितपणे एकवचनी शब्दाचा पर्याय क्रमांक लिहा.

34. (1) वाघ (2) सिंह (3) चित्ता (4) हत्ती

35. (1) शाळा (2) घंटा (3) तंटा (4) माता

36. डावीकडे दिलेल्या शब्दाचे लिंग खालीलपैकी कोणते?

*पोर :*

(1) फक्त पुल्लिंग (2) फक्त स्त्रीलिंग (3) फक्त नपुसक लिंग (4) तीनही पर्याय बरोबर

37. 'राष्ट्राध्यक्ष' या शब्दात किती व्यंजने येतात?

(1) सात (2) आठ (3) पाच (4) नऊ

38. 'पाऊस सुरु झाला तेव्हा मीना घरी आली' या वाक्याचा प्रकार खालीलपैकी कोणता?

(1) साधे वाक्य (2) संयुक्त वाक्य (3) मिश्र वाक्य (4) प्रश्नार्थक वाक्य

39. खालीलपैकी शुद्ध शब्दाचा क्रमांक लिहा.

(1) महात्म्य (2) माहत्म्य (3) महत्म्य (4) माहात्म्य

40. 'पोलिसाने चोर पकडला' या वाक्यातील प्रयोग ओळखा.

(1) कर्तरी (2) कर्मणी (3) भावे (4) अकर्मक कर्तरी

41. "धांदरट धनश्री धावताना धपकन् पडली" या वाक्यातील क्रियाविशेषण ओळखा.

(1) धांदरट (2) धावताना (3) धपकन् (4) पडली

42. खाली दिलेल्या आकृतीत दहा अक्षरी म्हण दडलेली आहे. तिच्यात दोनदा येणारे अक्षर फक्त एकदाच लिहिले आहे. ते अक्षर असलेला पर्याय क्रमांक लिहा.




(1) बा (2) ठो (3) धी (4) पो